आरती नंगेस्वामीची १

आरती नंगे स्वामिची । परब्रह्म योगियाची ॥ धृ. ॥

सांवळी मूर्ति दिगंबर । अजानुबाहु योगी थोर । सगुण देही निर्विकार । हनुमंताच्या पारावर । दिव्य दृष्टी प्रकाशाची ॥ १ ॥ परब्रह्म.. आरती..

ब्रह्मा विष्णू शिव भोळा । आत्मरूपी तूं सांवळा । प्रकाश ज्योतिच्या वेगळा । पिंड ब्रह्मांडी घननिळा । दाविली माया विश्वाची ॥ २ ॥ परब्रह्म.. आरती..

विश्वामध्ये व्यापियेला । दत्त नामी प्रगटला । डहेगाव क्षेत्राला । काटेपूर्णा स्नानाला । वाहिनी उत्तर दिशेची ॥ ३ ॥ परब्रह्म.. आरती..

पंचप्राणाचे ताट हाती । लावूनी कर्पूराच्या ज्योती । सद्‌भाव आवाळू आरती । प्रेमे लोचन पाझरती । पाहुनि मूर्ति नाथाची ॥ ४ ॥ परब्रह्म.. आरती..

सगुण निर्गुण निराकार । मूळ माया ओंकार । भक्त तारण्या अवतार । निवारी संकटे अनिवार । आंस विश्वनाथा सेवेची ॥ ५ ॥ परब्रह्म.. आरती..